# ‘वेध’ची जादू

– डॉ. आनंद नाडकर्णी

एखाद्या उपक्रमाबरोबर संस्थेचं नाव इतकं घट्ट जोडलं जातं की तो त्या संस्थेचा ‘फ्लॅगशिप प्रोजेक्ट’ बनतो. ‘वेध व्यवसाय प्रबोधन परिषद’ हा आयपीएचचा असाच एक उपक्रम आहे. आयपीएचच्या वीस वर्षांबरोबर या परिषदेने स्वत:ची अठरा वर्षं लगातार घोडदौड पूर्ण केली आहे...नेमकी काय आहे ही आयडिया?

आयपीएच सुरू झालं त्या नव्वदच्या दशकाच्या सुरूवातीला तणावांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन पक्का व्हायला सुरूवात व्हायची होती. टेन्शन हाताळणं शक्य वाटावं अशीच जीवनगती होती. एखादा बदल झाला की तो पचवायला वेळ मिळायचा. आयएपीएच ज्या ‘आधुनिक’ सेवा घेऊन आलं होतं. त्या बालक-किशोर-कुमार-युवा अशा वयोगटांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी होत्या. कुमारवय म्हणजे ‘ॲडोलसन्स’ ही अवस्थाही त्या काळात आजच्याएवढी रेखीव नव्हती. शरीरशास्त्रीय बदलांच्या दृष्टीने नव्हे, तर मानसिक, सामाजिक, कौटुंबिक आणि नातेसंबंधांच्या दृष्टिकोनातून. त्या वेळची तरूणाई प्रौढांपेक्षा वेगळ्या वळणाची होती,पण तिची लिपी आणि भाषा अजून बदलायची होती. तरूणाईचा उंबराही आजच्याएवढा ग्लोबल झाला नव्हता. ‘व्यवसायाची निवड’ या मुद्द्यावरही फार खल व्हायचा नाही. हुशार, मध्यम, निम्न अशा गुणस्तरांवरच्या सर्व विद्यार्थ्यांपुढचे पर्याय मर्यादित होते. हुशार ‘मुलं सायन्सला जायची, ‘मुली’ आर्ट्सला जायच्या. हुशारांतले अतिहुशार इंजिनियरिंग-मेडिकलला जायचे. मध्यम स्तरातली मंडळी कॉमर्स-आर्ट्सकडे. मुलांचे आणि मुलींचे व्यवसायही ठरलेले होते. प्रयोगशीलतेला वाव कमी, कारण पर्यायही मर्यादित. उपलब्ध असलेल्या व्यवसायनिवडीच्या पर्यायांबद्दलची माहिती मिळवण्याची ठिकाणंही कमीच होती. अशा साऱ्या पार्श्वभूमीवर आम्ही सुरू केलेली एक सेवा होती ‘व्यवसाय मार्गदर्शन सेवा’. ॲप्टिट्यूड टेस्टिंग करणं आणि काउन्सेलिंग करणं असं या सेवेचं स्वरूप. पूजा ठक्कर आणि शर्मिला लोंढे या आयपीएचच्या सहकारी हे काम करायच्या. अनुपमा देवळालीकर ही अजून एक सहकारी आयपीएचला जॉइन झाली होती. तीसुध्दा हे टेस्टिंगचं काम करायची.

आपल्या केंद्रावर अशी सोय आहे हे लोकांना कळणार कसं? प्रत्येक सेवेचा एक कम्युनिटी माऊथपीस, म्हणजे समाजापर्यंत पोहोचायचा मार्ग हवा, हे आमचं समीकरण होतं. व्यवसाय मार्गदर्शनासाठी आयपीएचकडे जरूर ते तज्ज्ञ आहेत, टेस्ट्स आहेत तर मग जाणीव-जागृतीसाठी आपण भरवू या करियर कॉन्फरन्स, म्हणजेच व्यवसाय परिषद, असा विचार पुढे आला.

नाव सुचलं ‘वेध’, म्हणजेच व्होकेशनल एज्युकेशन, डायरेक्शन ॲन्ड हार्मनी (VEDH)...दिशा आणि लय!

शांताराम राऊत सरांनी ‘वेध’चा एक देखणा लोगो तयार केला. या परिषदेमध्ये विद्यार्थी आणि पालकांना विविध व्यवसायांची माहिती द्यायची. आर्ट्स, सायन्स, कॉमर्सला गेल्यावर पुढच्या वाटांची माहिती द्यायची. गणित, इतिहास यासारखा एखादा विषय आवडीचा असेल, तर त्या विषयातील भविष्याच्या दिशा स्पष्ट करायच्या आणि हे करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातल्या व्यावसायिकांना बोलवायचं.

ठाण्याच्या शिवसमर्थ विद्यालयाचे काही वर्ग आणि सभागृह आम्ही शनिवार-रविवार भाड्याने घेतले. शनिवार दुपारी चार-पाच वर्गांमध्ये विविध विषयांवर संवादसत्रं; त्यानंतर एकत्रित परिसंवाद. रविवारीही तसंच. छोट्या वर्गांमधल्या सत्रांमध्ये आयपीएचचा एक प्रतिनिधी संवादक म्हणून असायचा. समजा, वैद्यक व्यवसाय असं सत्र असेल, तर पाहुणे म्हणून एक डॉक्टर, एक डेन्टिस्ट, एक फार्मासिस्ट, एक फिजिओ थेरपिस्ट असे सारे असतील.

उद्घाटनाच्या परिसंवादाचे वक्ते होते अमर चित्रकथा लिहिणारे अंकल पै, प्राचार्य प्रभुराम जोशी आणि निवृत्त पोलिस आयुक्त द. शं. सोमण. समारोपाच्या परिसंवादात होते निवृत्त महापालिका आयुक्त एस. एस. तिनईकर, डॉ.




श्रीराम लागू आणि डॉ. शरदिनी डहाणूकर. त्या वर्षी साधारणपणे २०० विद्यार्थी-पालक या उपक्रमाला आले होते. शाळेच्या दाराशी मोठ्या फळ्यावर वर्गातील सत्रांचे कार्यक्रम लावलेले होते. ही दोन्ही सत्रं इंटरेस्टिंग आहेत, असं कळल्यावर विद्यार्थी एकीकडे बसायचा तर पालक दुसऱ्या सत्राला. दोन्ही दिवसांचं मिळून शुल्क होतं मुलांना दहा रुपये तर पालकांना वीस रुपये. (पहिली तेरा वर्षं या शुल्कात फरक पडला नाही. आताही दोन्ही दिवसांचं शुल्क विद्यार्थी आणि पालक अशा दोघांसाठीही पन्नास रुपये भारतीय बैठक तर शंभर असतं...

पहिली वेध परिषद 'यशस्वी' झाली. म्हणजे काही विद्यार्थी-पालक तरी अगत्याने आले. परिसरातल्या तीस शाळांमध्ये आम्ही प्रचार केला होता. म्हणजे श्रमाच्या मानाने... ठीक आहे. पहिलंच वर्ष होतं १९९१ चं. 'वेध' चं दुसरं वर्ष मात्र १९९२ साली यायचं नव्हतं. १९९३ च्या डिसेंबरमध्ये आम्ही 'वेध' ची पुन्हा सुरुवात करायचं ठरवलं. या वेळी परिसर होता ठाण्याच्या बेडेकर विद्यालयाचा. या वेळी जाहिरातक्षेत्र, व्यवस्थापन, ह्युमॅनिटीज, दृकश्राव्य माध्यमं, मेडिकल-पॅरामेडिकल, कायदा, कॉमर्स, इंजिनियरिंग अशी एकूण वीस सत्रं दोन दिवसांमध्ये होती. एका वेळी चार 'कॉन्करंट' सेशन्स. उद्घाटन आणि समारोपाला कॉमन सत्र. या 'वेध' मध्ये एकूण ५८ तज्ज्ञ सहभागी झाले होते. या सर्वांशी संपर्क साधण्याचं काम प्रामुख्याने मी केलं. पण 'वेध'च्या आयोजनात रस घेणारा कार्यकर्त्यांचा गट या वर्षीपासून तयार झाला. हे सारे विविध क्षेत्रांतले लोक होते. या गटातले अनेकजण अजूनही या वार्षिक कामाकरता रजा टाकतात... आज ते स्वत: यशस्वी उद्योजक, कलाकार, मोठे एक्झिक्युटिव्ह असले तरी!

सहभागी झालेल्या ५८ तज्ज्ञांमध्ये कुमार केतकर, व्दारकानाथ संझगिरी, चंद्रकांत कुलकर्णी, देबू-श्रावणी देवधर, मंगेश कुलकर्णी, कमलेश पांडे, डॉ. अनिल तेंडोलकर, अच्युत गोडबोले, डॉ. प्रभाकर देवधर, डॉ. विद्याधर ओक अशी अनेक ग्रेट माणसं होती. हळूहळू या सर्वांचा संपर्क, प्रवास, अतिथ्य करणारी यंत्रणा तयार होत होती. मला आठवते आहे डिसेंबरच्या दुसऱ्या शनिवारी-रविवारी वेधची तारीख (ही तारीख गेली सतरा वर्षं बदललेली नाही). त्याआधीच्या शुक्रवारी मी दादरच्या माझ्या क्लिनिकमध्ये होतो. बेडेकरचे मुख्याध्यापक अशोक चिटणीस सर यांच्या ऑफिसातून मला अनुपमाचा फोन आला : ''डॉक्टर, वेगवेगळ्या शाळांकडून आतापर्यंत ७०० नावं आलीत..'' चिटणीस सरांनी शाळेची सारी व्यवस्था गतिमान केली. दुसऱ्या दिवशी उद्घाटनाच्या सत्राला एक हजारावर विद्यार्थी आणि पालक...या वेळी मी चाळीस शाळांची पायपीट केली होती.

१९९३ ते २००१ पर्यंत मी हे दरवर्षी करत असे. प्रत्येक शाळेतल्या नववी-दहावीच्या, ज्युनियर कॉलेजच्या प्रत्येक वर्गामध्ये जाऊन 'वेध'ची माहिती द्यायची. एका दिवसात मी तीच माहिती सरासरी ४० वेळा द्यायचो. असे आठ-दहा दिवस. प्रवास अर्थातच रिक्षाने. २००७ च्या 'वेध'ची उपस्थिती ६३५० च्या वर गेली तेव्हा मला एका चॅनेलने विचारलं, ''त्यांची बौध्दिक, भावनिक गरज पूर्ण करण्यासारखा आशय त्यांना मिळत असावा. दुसरं असं, की त्यांना 'वेध'ची सवय लागली आहे.'' मी म्हणालो.

'वेध'ची प्रभा फाकू लागली तसे गावोगावचे पालक,



नागरिक, विद्यार्थी या परिषदेला येऊ लागले. आम्ही त्या सर्वांना सांगतो, की तुमच्या सहा ते आठजणांच्या कोअर ग्रुपने आमच्याबरोबर एका 'वेध'चं आयोजन करायचं. आमची टीम या ग्रुपचा एक वर्कशॉप घेईल आणि मग तुम्ही तुमच्या गावात 'वेध' करायचं. अहमदनगरची 'स्नेहबंध–६९' आणि फिरोदिया हायस्कूल गेली पाच वर्षं 'वेध' आयोजित करताहेत. औरंगाबादच्या टेंडरकेअर शाळेचे केंकरे पती–पत्नी, त्यांचे शिक्षक आणि पालक सलग तीन वर्षं सरस आयोजन करत आहेत. तर नागपूरमध्ये २००९ हे वेधचं दुसरं वर्ष. आयपीएचची माजी सहकारी अनुपमा गडकरी (देवळालीकर) ही या गटाची संघटन आहे. या सर्व ठिकाणी मी जातो आणि पूर्ण सात–आठ तासांचं संचालन करतो. परंतु पुढे जर गावांची संख्या वाढत गेली तर स्थानिक संचाचंच प्रशिक्षण करावं लागेल. सुदैवाने आयपीएचचा 'आवाहन' हा माध्यम विभाग आज 'वेध'च्या डीव्हीडीज प्रकाशित करत आहे. आयपीएचमध्ये असलेल्या 'वेध'च्या फोटो अल्बम्सचा वापर करून मी 'इव्होल्युशन ऑफ वेध' असं पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन तयार करत आहे. तसंच संवादकांसाठी कार्यशाळा घेता येईल असं दृकश्राव्य साहित्यही मी तयार करत आहे. कारण 'वेध'सारख्या व्यासपीठावर नेहमीचे 'कसलेले' मुलाखतकार नको असतात, तर थोडं कार्यकर्तेपण असलेली कमिटेड माणसं हवी असतात. त्यांना संवादक म्हणून तयार करता येईल. मात्र अशा तऱ्हेचे उपक्रम करण्यासाठी व्यवस्थापन कौशल्य, चिकाटी आणि बांधिलकी हवी.

१९९३ च्या 'वेध'चं यश हा संपूर्ण आयपीएचसाठीचा 'कमबॅक सिग्नल' होता हे लक्षात घ्यायला हवं. आमच्यासाठी ते प्रभावी अँटी–डिप्रेसन्ट औषध होतं. या परिषदेच्या संदर्भात लोकांच्या प्रतिक्रिया अशा आल्या, की समांतर सत्रं ठेवू नका. आम्हाला अगळ्या वक्त्यांना ऐकायचं आहे. मात्र गप्पांचं माध्यम बदलू नका.

'वेध'च्या यशाचं एक रहस्य त्यातल्या गप्पा–संवादांच्या अनौपचारिक स्वरूपामध्ये आहे. हा फॉर्म 'वेध'ने वापरायला सुरूवात केली तेव्हा मराठी जगतातील 'मुलाखत घेणं' हे प्रकरण अतिशय 'स्टायलाइज्ड' होतं. संगीत नाटक आणि छबिलदासची शैली, इतका फरक वाटायचा १९९२–९३ मध्ये. तेव्हापासून आजपर्यंत हा अनौपचारिक भाग तसाच आहे. हळूहळू त्यातल्या स्वागत, भेट, फुलं, आभार, समई या साऱ्या उपचारांना फाटा मिळाला आहे.

१९९४ पासून समांतर सत्रं बंद झाली. शनिवार दुपारी २ ते ७ आणि रविवार सकाळी ९ ते सायंकाळी ६ असा चौदा तासांचा कार्यक्रम. एकूण दहा सत्रं. काही सोलो...म्हणजे एकच पाहुणा, तर कधी एकाच वेळी दोन पाहुणे. म्हणजे प्रत्येक 'वेध'ला साधारण बारा ते चौदा तज्ज्ञ. अशा प्रकारे गेल्या १८ वर्षांमध्ये 'वेध'मध्ये सुमारे २२५ ते २५० तज्ज्ञांनी हजेरी लावली. त्यामध्ये अहमदनगर (५ वर्षं–२५ पाहुणे), औरंगाबाद (दोन वर्षं–१० पाहुणे), नागपूर (एक वर्ष–६ पाहुणे) मिळवले तर एकूण संवादांची संख्या तीनशेच्या घरात जाईल. मला कोणी विचारलं, की व्यवसाय मार्गदर्शनाच्या क्षेत्रामध्ये तुम्ही कोणता डिप्लोमा केला? तर मी म्हणेन, तीनशे संवादांचा. यातली प्रत्येक व्यक्ती म्हणजे शिकण्यासाठीचा ठेवा होता. ९३ वर्षांच्या गंगूबाई हनगलांची शेवटची जाहीर मुलाखत मी (आणि दोस्त विदूर महाजनने) 'वेध'मध्ये घेतली. भारतीय संगीताचा आपला ठेवा घेऊन त्या पहिल्यांदा अमेरिका दौऱ्यावर गेल्या तेव्हा त्यांना कोणी तरी म्हणालं, ''तिथे सारं इंग्रजीमध्ये...तुमचं कसं निभणार?'' तर गंगूबाई त्यांच्या शांत पण मिस्कील शैलीत म्हणाल्या, ''मला त्यांची भाषा नीट येत नाही, पण त्यांना माझी भाषा नक्कीच कळणार!''

समोरचा गोंधळला.

''संगीताची भाषा!''

समोरचा पॅक झाला.

असे किती अनुभव लिहू? जॉनी लीव्हरला मी प्रश्न केला नगरच्या एका वेधमध्ये, ''तुम्ही नृत्य शिकलात का? हे अंग कसं आलं तुमच्यात?''

''मी झोपडीसारख्या घरात राहायचो– मध्य मुंबईच्या वस्तीमध्ये. दर जुलै– ऑगस्टमध्ये मुंबईचा पावसाळा. पाणी शिरायचं घरात. मी कॉटवर चढायचो. पाणी वाढलं तर कपाटावर...एवढ्यात छत गळायला सुरूवात व्हायची. मग एका हातात भांडं, तर दुसऱ्या हातात ग्लास...इकडचा थेंब तिकडचा थेंब...''

हे सारं बोलताना जॉनीचं शरीर अन् चेहरा चॅप्लिनचा दिसला मला. 'थेंब इकडचा–तिकडचा' करताना त्याचे हात, पाय, चेहरा लयीत हलत होते. तो थांबला आणि




म्हणाला, ''सीख गया मैं डान्स...ऐसे...''

प्रत्येक संवादसत्रातून माझं शिक्षण होत होतं.

'वेध'मध्ये येणाऱ्या प्रत्येक वक्त्याबद्दल 'वेध'ची टीम माहिती गोळा करते. वक्त्याकडून पाठवली गेलेली माहिती, नेटवर सर्च, त्या व्यक्तीला ओळखणाऱ्यांकडून माहिती, असे अनेक मार्ग वापरले जातात.मानसशास्त्रज्ञ कुलदीप दाते हे काम करतो. गेली आठ वर्षं माझी सहकारी दीपिका दाबके आणि पत्रकार रवींद्र मांजरेकर माझे 'को-अँकर' असतात. आम्ही सारे बसून प्रत्येक सत्राला 'फ्लो' तयार करतो. येणाऱ्या वक्त्याला देण्यासाठीचे प्रश्न तयार करतो. शक्य तिथे मी त्या वक्त्याला प्रत्यक्ष भेटतो, नाही तर फोनवर बोलतो. खूप वेळा उत्स्फूर्त वाटणारं सत्र अतिशय कष्टपूर्वक 'जमवलेलं' असतं. ठाण्याबाहेरच्या 'वेध'मध्ये मी एकटाच असतो. नगरमध्ये आता मी सुनंदा अमरापूरकरांना जोडीला घेतो. हळूहळू हे सूत्रसंचालन इतरांनी करायचंय. ठाण्याच्या विसाव्या 'वेध'पासून मी 'वेध'चं डिझायनिंगही सहकाऱ्यांवर सोपवणार आहे.

१९९१ ते २००९ या काळामधली पिढी जसजशी



'दृकप्रधान' म्हणजे व्हिज्युअली रिस्पॉन्सिव्ह होत गेली तसा मी वेधचा 'लुक अँड फील' बदलत गेलो. प्रकाशयोजना, नेपथ्य, संगीत हे सारं असं हवं की त्याची नाळ आजच्या तरुणाईबरोबर जुळायला हवी. टेलिव्हिजनवरच्या शोचा फील देणं हे खरं तर अजिबात खर्चिक नसतं. फक्त समोरच्या विद्यार्थ्याच्या भूमिकेत स्वत:ला ठेवायला हवं. जसा काळ जातोय तसं 'वेध'मधल्या फॅकल्टीचं सरासरी वयही मी कमी करतो आहे. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमांना 'ज्ञानामृत' पाजणारी मंडळी आणली जातात. तसं 'वेध'मध्ये नसतं. फॅकल्टी वयाने मोठ्या असल्या तरी त्यांची संवादशैली 'यूथ फ्रेंडली' हवी.. 'वेध'मध्ये आमटे कुटुंबातल्या डॉ. शीतल आमटे यांचं सत्र हिट झालं.हॉलिवुडला जाऊन ॲनिमेशन शिकलेला चेतन देशमुख हिट झाला. सापांच्या जगातला मयूर कामथ हीरो बनला. पक्षितज्ज्ञ प्रसाद पुरंदरे वेड लावून गेला. अमृता सुभाषने हजारो विद्यार्थ्यांना डोलवलं. एका बाजूला असे तरुण, तर दुसरीकडे ज्येष्ठांमध्येही जबरदस्त रेंज...डॉ. नारळीकर, डॉ. गोवारीकार, डॉ. काकोडकर यांच्यासारखे शास्त्रज्ञ; अरुणा रॉय, राजेंद्र सिंग, वंदना शिवा, मेधा पाटकर यांच्यासारखे मॅगेसेस ॲवॉर्डविजेते; श्याम बेनेगल, आशुतोष गोवारीकर यांच्यासारखे दिग्दर्शक, तर गंगूबाई हनगलांपासून कलापिनी कोमकली या पिढ्यांमधले गायक. अच्युत गोडबोले, दिपक घैसास असे आय. टी. अग्रणी. खाद्य उद्योगातल्या स्मिता पेठे, मराठवाड्यात यशस्वी साखर कारखाना चालवणारे यू. डी. ठोंबरे असे उद्योजक, केरळला भारताच्या पर्यटन नकाशावर आणणारे डॉ. जयतिलक, अहमदाबादचे कलाकार-समाजसंशोधक विनय-चारूल, उत्तरांचलचे अवधेश कौशल, दिल्लीच्या अंशू गुप्ता...भारताच्या वेगवेगळ्या भागांतल्या अनेक धडपड्यांना 'वेध'ने महाराष्ट्रामध्ये प्रथम आणलं. आमिर खान, जया बच्चन, अतुल कुलकर्णी, सोनाली कुलकर्णी असे अनेक कलाकार आले. हेमंत करकरे, डॉ. सदानंद दाते यांच्यासारखे आयपीएस अधिकारी आले. सैन्यदलातले शूर आले तशी नेपाळची व्याघ्रकन्या डॉ. लतिका राणाही आली.

डिसेंबर १९९४ पासून १९९९ पर्यंतचं 'वेध' ठाण्याच्या मो.ह.विद्यालयाच्या मैदानात झालं. शाळेची मैदानं बदलण्यामागचा हेतू हा होता, की वेगवेगळ्या शाळांमधल्या

विद्यार्थ्यांना 'वेध'ची चव कळावी. 'मो.ह.'चे त्या वेळचे मुख्याध्यापक जाधव सर आणि ज्येष्ठ शिक्षक अविनाश बर्वेसर त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसह 'वेध'साठी झटायचे– अगदी घरचं कार्य असल्यासारखे. या 'वेध'चं उद्घाटन पहिली प्रवेशिका विकत घेणाऱ्या विद्यार्थ्याच्या हस्ते झालं. तो 'मो.ह.'मध्ये दहावीत शिकत होता. त्याचं नाव रवींद्र मांजरेकर. तोच रवींद्र आज पत्रकार बनलाय आणि 'वेध'चं सूत्रसंचालन करतो.

या परिदषदेमध्ये मंगेश पाडगावकर आणि सुभाष दांडेकर या दोघांबरोबर मी ' व्यवसायातील निष्ठा आणि तन्मयता' यावर गप्पा मारल्या. पाडगावकर म्हणाले, ''आनंदने इथे एक उद्योगपती आणि एक निरुद्योगपती एकत्र आणलेत!'' पण हे सत्र इतकं 'कॉम्प्लिमेन्टरी' झालं की बस्स! रंग आवडणं आणि शब्द आवडणं हा 'कॅम्लिन' आणि कवी यातला समान धागा घेऊन हे दोघं तुफान बोलले. या 'वेध'पासून डॉ. नरेंद्र जाधवांचा स्नेह जडला.

१९९५ पासून 'वेध'ची रचना एका सूत्राभोवती होऊ लागली. 'बहुरंगी बुध्दी' हे पहिलं सूत्र. आता ही परिषद 'करियर कॉन्फरन्स'कडून 'करियर पर्स्पेक्टिव्ह्ज कॉन्फरन्स'कडे जायला लागली. म्हणजे असं, की अनेक व्यवसायांची माहिती देण्यापेक्षा त्या त्या क्षेत्रातल्या व्यावसायिकांचा प्रवास हा आता केंद्रस्थानी येऊ लागला. बुध्दीकडे पाहण्याचा मर्यादित दृष्टिकोन टक्केवारी आणि मेरिट लिस्टला महत्त्व देतो. पण खरं तर बुध्दी अनेक 'प्रकारांची' असते असं मानसशास्त्र म्हणतं. या सूत्राभोवती ही परिषद गुंफली होती. या परिषदेत सुरांमधली बुध्दिमत्ता उलगडली यशवंत देवांनी, तर शब्दांमधली विश्वास पाटलांनी. रंगांवर बोलले रवी परांजपे, तर व्यवस्थापनासाठी लागणाऱ्या बुध्दीवर प्रकाश टाकला डॉ. राम जोशी यांनी. अरुण देशपांडे यांनी 'कन्टूर मार्कर' यंत्राचा प्रवास सांगत मांडली 'यंत्रज्ञा'ची बुध्दी. पुण्याच्या बासरीवादक पं. केशवराव गिंडे सरांनी दाखवली बासरीच्या रचनेतल्या 'तंत्रज्ञाना'ची चमक. 'शरीरातली बुद्धी' ह्या सत्रामध्ये एक जिमनॅस्ट, एक शरीरसौष्ठतज्ज्ञ आणि एक मॉडेल अशी फॅकल्टी होती. मॉडेल म्हणून येणार होती त्या वेळची एक लॅक्मे गर्ल. रविवार सकाळी अकराचं सत्र सकाळी सातला तिचा फोन : ''जमणार नाही.'' आता मॉडेल म्हणून कोणाला विचारावं? तुषार दळवी हा माझा मित्र. त्या काळात त्याच्या तीन–चार जाहिराती टीव्हीवर होत्या. त्याला फोन फिरवला आणि पावणेअकरा वाजता हा दोस्त हजर झाला.

या 'वेध'पासून मी विद्यार्थ्यांना गाणी शिकवायला सुरुवात केली. मीच ढोलकी वाजवायचो आणि चळवळीतली गाणी गायचो. पुढच्या 'वेध'पासून मी दर वर्षीच्या सूत्रानुसार गाणं तयार करून, चाल लावून सादर करायला सुरुवात केली. अशी १३ 'वेध'गाणी २००९ पर्यंत तयार झाली. या गाण्यांचा उपयोग मला शिस्तपालनासाठी होऊ लागला. १९९६ मध्ये 'वेध'ला आलेल्या विद्यार्थी–पालकांची संख्या दोन हजारांवर गेली. 'कल्पकता आणि व्यवसाय' असं या 'वेध'चं सूत्र होतं. विजय तेंडुलकर, दिलीप प्रभावळकर ह्यांच्या सोबत विविध क्षेत्रांतले तज्ज्ञ होते. १९९७ च्या 'वेध'मध्ये 'वैज्ञानिक दृष्टिकोन आणि व्यवसाय' या सूत्राभोवती जयंत नारळीकरांचं सत्र झालं. याच वर्षी एक विलक्षण सत्र होतं– 'जादू आणि विज्ञान.' व्यवसायाने अॅनेस्थेसिस्ट असलेले पण निष्णात जादूगार असलेले डॉ. हिमालय पंतवैद्य आणि मनोविकारतज्ज्ञ परंतु त्याचबरोबर अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचं कार्य करणारे डॉ. प्रदीप पाटकर यांनी हजारो विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केलं. 'गूढ आणि विज्ञान' या सत्रामध्ये रत्नाकर मतकरींनी रंग भरले.

आता वेध हा 'डिझायनर प्रॉडक्ट' बनत होता. दोन दिवसांमधली सत्रं कशी असावीत, लोकप्रिय व्यक्तींबरोबर अतिशय महत्त्वाच्या पण अप्रसिध्द व्यक्तींची सांगड कशी घालावी यावर आमची चर्चा व्हायची. शब्दप्रधान सत्रं आणि सादरीकरणाची म्हणचे परफॉर्मन्सचा भाग असलेली सत्रं यांची सांगड आम्ही घालू लागलो. वर्षागणिक 'वेध'ची लोकप्रियता वाढत होती. आयपीएचच्या व्यवसाय मार्गदर्शन चाचण्यांसाठी आता विद्यार्थी येऊ लागले होते. परीक्षेची भीती, नातेसंबंधातला तणाव, अशा अनेक कारणांसाठी तरुण–तरुणी आपलेपणाने आयपीएचमध्ये काउन्सेलिंगला येऊ लागले. 'वेध'पासून स्फूर्ती घेऊन आपलं करियर बनवणारे विद्यार्थी प्रत्यक्ष भेटत होते, पत्रं लिहीत होते. शाळेतल्या वर्गांचे विद्यार्थी मला संयुक्त पत्र लिहायला लागले. रस्त्यामध्ये मला थांबवून तरुण मुलं–मुली विचारू

लागल्या, ‘‘काका, या वर्षी वेधला कोण येणार?’’

शनिवार-रविवारच्या ‘वेध’मध्ये रविवारी दुपारच्या जेवणाला हजारो मुलं-पालक डबे उघडून अंगतपंगत करू लागले. मी त्या सर्व वर्तुळांमध्ये चव घेत फिरत असतो. ‘काका, काका’ म्हणून मुलं-मुली मला डब्यातलं काही तरी ऑफर करतात. खूप समाधानाचे क्षण असतात ते.



१९९८ आणि १९९९ चा ‘वेध’ ठाण्याच्या सरस्वती सेकंडरी शाळेच्या प्रागंणात झाला. डॉ. अभय बंग, डॉ. रवीन थत्ते, एस्सेल वर्ल्डचे अशोक गोयल, सौमित्र (किशोर कदम), भारतीय तोफदलाचे ब्रिगेडियर कोठारी, एव्हरेस्टवीर सुरेंद्र चव्हाण, गायक संजीव अभ्यंकर अशी मंडळी होती. वेगवेगळे व्यवसाय करण्याचा अनुभव असणारी प्रिया तेंडुलकरही त्यात होती. डिसेंबरातल्या धुक्यामुळे दिल्लीहून येणारं तिचं विमान निघूच शकलं नाही. आता आयत्या वेळी कोण मिळणार? सुहास जोशी! सुहासताईंना फोन करून परिस्थिती सांगितली. ‘‘दोन पोळ्या टाकते आणि आलेच...’ त्या म्हणाल्या. ते ‘एक्सटेम्पोर’ सत्र भन्नाट रंगलं आणि मंडपाच्या लांबच्या टोकाला एक गाडी येऊन थांबली. गाडीचा दरवाजा उघडून तिकडून डॉ. श्रीराम लागू ऐकत होते. पहिल्या वेधचे फॅकल्टी ते. त्यांना मानाने व्यासपीठावर आणलं. ‘‘मोठाच पसारा झालाय तुझ्या उपक्रमाचा!’’ डॉक्टरांनी शाबासकी दिली.

होता होता २००१ साली ‘वेध’चं दशक आलं!

या ‘वेध’चं सूत्र होतं ‘स्फूर्ती आणि सायास : करियरचा प्रवास’ अर्थात इन्स्पिरेशन ॲन्ड परस्पिरेशन’. हे वर्ष ‘वेध’चं अजून एक परिवर्तन वर्ष ठरलं. हळूहळू ‘वेध’ व्यवसायनिवडीकडून ‘जीवनसंस्कारा’कडे जाऊ लगलं होतं. आता ती ‘लाइफ व्हॅल्यू कॉन्फरन्स’ होत होती आणि येणारे फॅकल्टी हे ‘रोल मॉडेल्स होते. परिश्रमांमधलं गाणं शोधण्याच्या त्या वर्षीच्या प्रवासात सहभागी झाल्या होत्या अरुणा रॉय, आशुतोष गोवारीकर, रामदास पाध्ये...गंमत वाटली असेल ना या तीन नावांना एकामागोमाग वाचून? पण ‘परिश्रम’ या सूत्राचे पदर त्यांनी उलगडले.

याच वर्षी केसरी आणि वीणा पाटील, इंडोकोचे, सुरेश कारे आणि त्यांची मुलगी अदिती पाणंदीकर यांचं छान सत्र झालं- ‘बाप-लेकी’ या शीर्षकाखाली. ‘खाना-खजाना’चे संजीव कपूर, नाटककार सतीश आळेकर यांचं सत्र रंगलं होतं, तर पटांगणाजवळच्या शाळेच्या इमारतीमध्ये एक परीक्षा चालली होती. तिथल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी पोलिसांत तक्रार दिली. व्यासपीठावरून मला कळत होतं की काही तरी गडबड आहे. आमचे कार्यकर्ते, पोलिस आणि पालक यामध्ये तावातावाने चर्चा सुरू झाली. मी सत्र थांबवलं. साऱ्या प्रेक्षकांना विश्‍वासात घेऊन शांत राहायला सांगितलं. खरं तर आम्ही शाळेचं मैदान अधिकृतपणे भाड्याने घेतलं होतं. पोलिस परवाना आमच्याकडे होता. पण साडेतीन हजार लोकांच्या टाळ्या आणि प्रतिसादाचा आवाज येणारच की!

‘‘मी ध्वनिव्यवस्थेची दिशा बदलतो. परीक्षा होईपर्यंत टाळ्या वाजणार नाहीत ही माझी हमी...’’ मी म्हणालो. ‘‘ते कसं शक्य आहे?’’ पालक म्हणाले. मी पालक आणि पोलिसांना व्यासपीठाच्या शेजारी खुर्च्या देऊन बसवलं. माझ्या सर्व परिषद प्रतिनिधींना परिस्थिती समजावून दिली. टाळ्यांच्या जागी दोन्ही हात उंचावून हाताच्या बोटांची कमळं करण्याची ट्रिक साऱ्यांना समजावून सांगितली. सकाळी साडेदहा ते साडेबारा या दोन तासांमध्ये टाळी वाजली नाही. साडेबाराला पेपर संपला. इन्स्पेक्टरनी मला ‘सुरेख’ अशी हस्तमुद्रा करत मानेने इशारा केला आणि मी श्रोत्यांना म्हणालो,‘‘दोन तासांनंतरच्या पहिल्या टाळ्या तुम्हा सर्वांसाठी.’’ आता ‘वेध’मध्ये सहभागी होण्यासाठी ठाण्यातल्या शाळाच नव्हे, तर वसई, विरार, भिवंडी, पनवेल, रसायनीपासून विद्यार्थी येऊ लागले होते. ‘वेध’च्या सत्रांनंतर विद्यार्थी मला गराडा घालत असतात. एकदा त्यातला एक धिटुकला मला म्हणाला, ‘‘काका, तुम्हाला

एक सांगू?..जरा प्रायव्हेट आहे.'' मी त्याला थोडं बाजूला घेतलं. माझ्या डोळ्यांत पाहत तो म्हणाला, ''आजपासून वीस-पंचवीस वर्षांनी मला या व्यासपीठावर यायचं आहे. मी कोणी तरी मोठा होणार, पण चांगला माणूस होणार.''

प्रत्येक सत्रानंतर स्वाक्षऱ्या घेण्यासाठी गराडा घालणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत होती. सर्व फॅकल्टीच्या स्वाक्षऱ्या आधीच घेऊन त्यांचं एक 'स्मृतिपत्र' आम्ही तयार करू लागलो. कविमित्र अशोक बागवेने त्याला नाव दिलं 'हस्ताचा पाऊस'. त्या वर्षीपासून ही कल्पना अमलात आली. स्वाक्षऱ्यांसोबत त्या वर्षीच्या सूत्राशी सुसंगत अशी सुवचनं छापून सारं डिझाइन करण्याचं कसब राऊत सरांकडून कुलदीप शिकला. अनेक वर्षांचे 'पाऊस' काळजीपूर्वक साठवलेले विद्यार्थी आणि पालक अनेकदा भेटतात.


'वेध'मध्ये विद्यार्थी आणि पालकांसाठी 'शनिवारची डायरी' नावाची स्पर्धा असते. शनिवारच्या सत्रांवरच्या प्रतिक्रिया लिहून रविवारी सकाळी घ्यायच्या. रविवारी संध्याकाळी बक्षीस समारंभ असतो. विद्यार्थी आणि पालकांच्या शेकडो लेखी प्रतिक्रिया त्यामुळे उपलब्ध होतात. वेध परिषदेमध्ये येणाऱ्या पाहुण्यांची माहिती आधी प्रसारित करून त्यावर विद्यार्थ्यांकडून प्रश्न मागवले जातात. या प्रश्नांना सत्रामध्ये गुंफताना त्या विद्यार्थ्यांचा खास उल्लेख केला जातो.

२००१ चं अजून एक वैशिष्ट्य असं, की या वर्षीपासून 'वेध'च्या आयोजनामध्ये 'सीसी' म्हणजे करियर कॉन्फरन्सबरोबर 'एसएस' म्हणजे सूर-संमेलनाची भर पडली. ही कल्पना सुचवण्याचं आणि प्रत्यक्षात आणण्याचं श्रेय माझा तळेगावचा मित्र विदूर महाजन याचं. आयपीएचच्या नव्या जागेच्या निधी उभारणीसाठी भारतीय शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करू या ही त्याची कल्पना. त्याप्रमाणे त्याने या क्षेत्रातले अनेक दिग्गज आयपीएचसाठी आमंत्रित केले. त्यामुळे 'सीसी'साठी आलेल्या मॅगसेसे विजेत्या अरुणा रॉय रात्री मालिनीताई राजूरकरांचं गाणं ऐकत होत्या. तर मालिनीताई मोठ्या तन्मयतेने 'सीसी'ची सत्रं पाहत-ऐकत बसल्या होत्या. स्थानिक पातळीवर मुकुंद मराठे आणि त्याची टीम या सूरसंमेलनाच्या आयोजनामागचा कणा होती. आयपीएच टीममधल्या शर्मिला लोंढे, मंजुश्री पाटील या शास्त्रीय संगीताचं ज्ञान असलेल्या सहकारीही आयोजनामध्ये असत. शर्मिलाने मंजुश्री आणि डॉ. अनघा वझे तसंच मुकुंदाला बरोबर घेऊन पुढे 'वेध'च्या गाण्यांची सीडी काढली. ती आवाहन या माध्यम विभागाने प्रसिध्द केली. आता 'वेध'ची गाणी शाळाशाळांमधून ऐकू यायला लागली. काही शाळांच्या डायऱ्यांमध्ये इतर प्रार्थनांसोबत 'वेध'ची हिंदी-मराठी गाणी छापली जाऊ लागली. आता वेध अनुभवलेले सिनियर विद्यार्थी ज्युनियर्सना सांगायला लागले, 'वेध' एकदम 'सही' असतो. सत्रांच्या नोट्स काढणाऱ्या विद्यार्थी-पालकांची संख्या वाढू लागली, 'वेध'ला आलेल्या वक्त्यांना भेटणं, त्यांना मेल पाठवणं असा उत्साह विद्यार्थी-पालक दाखवू लागले. पुण्याच्या ललित कला केंद्राचे संचालक म्हणून दहाव्या वेधला सतीश आळेकर आले होते. 'वेध'चा संदर्भ देऊन विद्यार्थी-पालक त्यांना भेटायला आले की ते मला लगेच पोचपावती देत. अनेक हितचिंतक आता वेधसाठी फॅकल्टी सुचवायला लागले. दहाव्या 'वेध'मध्ये आलेले वसंत संख्ये हे याचं उदाहरण. स्वतःच्या शारीरिक अपंगत्वावर मात करून राज्य सरकारच्याविकलांग पुनर्वसन योजनेचे संचालक होण्याचा त्यांचा प्रवास विलक्षण स्फूर्तिदायक आहे. महानगर दैनिकामध्ये त्यांच्यावर लिहून आलेला मजकूर दोस्त सदाशिव अमरापूरकरांनी वाचला आणि मला तत्काळ फोन..'वेध'साठी उत्तम माणूस!

एकविसाव्या शतकामध्ये वेधला अधिक विशाल प्रांगणाची गरज भासायला लागली. २००३ पासून ते आजतागायत भगवती शाळेजवळच्या (आधी खासगी, आता म्युनिसिपल मैदानावर) 'वेध' भरू लागलं. आधीच्या वर्षी पुढच्या वर्षीचं सूत्र जाहीर करण्याचा पायंडा पडला. आता व्यक्तीची लोकप्रियता या मुद्याला कमी महत्त्व आलं. या व्यासपीठावरून समोर येणारा वक्ता 'वेगळा' असणार याची खात्री पटू लागली. काश्मीरमधल्या दहशतवादामुळे विस्थापित झालेल्या मुलांसाठी शाळा चालवणारा संजय नहार असो, की निवडणूक प्रक्रियेला पारदर्शक बनवण्याचे प्रयत्न करणारे अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे. भिलवडीच्या चितळे कुटुंबाच्या तर तीन पिढ्या व्यासपीठावर आल्या आणि दुग्धव्यवसायाचं गमक समजावून गेल्या. मुंबईचे डबेवाले आले आणि संघशक्तीच्या उदाहरणाने मंत्रमुग्ध करून गेले. आता व्यासपीठाच्या शेजारी मोठे प्रोजेक्शन

स्क्रीन्स लागायला लागले. चार स्क्रीन्सवरून सत्रं दाखवली जाऊ लागली. शनिवारी परिषदेच्या सुरूवातीपूर्वी भव्य वाटणारा मांडव खचाखच भरल्यामुळे रविवारी सकाळी तीस फुटांनी वाढवणं, असे प्रकार सुरू झाले. वेधसाठी वर्षानुवर्षं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी उभी राहिली. नेमाने जाहिराती, देणग्या देणाऱ्या हितचिंतकांचा गट जमला. शैक्षणिक कार्यक्रमांना उपस्थिती नसते, लोकांना गंभीर कार्यक्रम आवडत नाहीत, असं म्हणणारे ‘वेध’चा शहरोशहरीचा प्रतिसाद पाहून चकित होतात. उत्तम पॅकेजिंग आणि सशक्त आशय यांची सांगड घातली तर हे घडू शकतं. दुसरं असं, की उपयुक्त कार्यक्रम सातत्याने करत राहिलो तर साथ मिळते. वेधसाठी दरवर्षी काम करणारे अनेक विद्यार्थी-पालक स्वयंसेवक आहेत. ते वर्षानुवर्षं निष्ठेने पडेल ते काम करत प्रोजेक्ट उभा करतात. मंडपवाले नाखवा, साऊंडवाले प्रफुल्ल आठवले, स्क्रीन कॅमेरावाले नरेंद्र बेडेकर हे कोणी ‘वेध’ला पैशात मोजत नाहीत. राऊत सर, सचिन गावकर, माणिक वालावलकर, देवेंद्र पेम यांना तर वेध ‘चढतेच’. आमचे सारे विश्वस्त, साराच्या सारा स्टाफ या ‘लग्ना’च्या मांडवात झटत असतो. स्वयंस्फूर्त नियोजनाचं हे उदाहरण आहे.

श्रोत्यांच्या भावना आणि विचार या दोघांनाही समतोलपणे स्पर्श करणं हे वेधच्या अनुभवाचं गमक आहे. या व्यासपीठावर माणसं निर्मळपणे बोलतात. इथे मोकळेपणी हसलं आणि रडलं जातं. उद्योजिका नंदिनी वझे यांचा एकाकी लढा असो की मूकबधिर तारानाथ शेणॉय यांची सागरी खाड्या पार करण्याची अनोखी जिद्द... सारे श्रोते एकदिलाने त्यात सहभागी होत असतात. आंब्याच्या व्यापाराबद्दल अशोक हांडे बोलत असू दे किंवा बायोटेक्नॉलॉजीतल्या करियर्सबद्दल राघवेंद्र गायकैवारी, तिथे जशी माहिती नावीन्यपूर्ण तशी सांगणाऱ्याची तळमळही महत्त्वाची. आयआयटीचे जयेश बेलारे, गणितज्ज्ञ डॉ. नितीन नित्सुरे, फिजिक्सचे डॉ. आतिश दाभोळकर यांच्याबरोबर अभिनेत्रींना वेशभूषा, केशभूषा करुन सुंदर बनविणाऱ्या लीना दरू यांची सत्रंही खूप गाजली. डॉ. अरूण द्रविड हे असे एक गृहस्थ, ज्यांनी ‘सीसी’ मध्ये आयआयटीपासून अमेरिकेचा प्रवास रंगवला आणि रात्री ‘एसएस’ मध्ये जयपूर-अत्रौली घराण्याची गायकीही दीड



तास सादर केली.

एका वर्षीच्या सूत्रामध्ये ‘जागतिकीकरणा’चा संदर्भ होता. त्यातल्या एका सत्रामध्ये एकाच वेळी व्यासपीठावर होते उद्योजक सीईओ डॉ. उदय निरगुडकर आणि ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. आनंद तेलतुंबडे. दोघही ज्ञान आणि अनुभवाने श्रेष्ठ, परंतु जागतिकीकरणाकडे पाहण्याचे दोघांचे दृष्टिकोन दोन ध्रुवांवरचे... म्हणजे भिन्न. या सत्राचं सूत्रसंचलन हा माझ्यासाठी घाम फुटवणारा अनुभव होता. प्रत्येकाचे मुद्दे त्यातला अभिनिवेश काढून ‘समअप’ करणं आणि सत्राची गाडी पुढेनेणं हे एका बाजूने खूप इंटरेस्टिंग होत. ‘‘तू होतास म्हणून तडीला नेलंस सुखरूपपणे!’ पाठीत धबका मारत उदय (कॉलेजपासूचा मित्र) मला व्यासपीठावरून खाली उतरल्यावर म्हणाला... सारा पाच



हजारांचा समुदाय ही थक्क करणारी बौद्धिक लढत एखाद थ्रिलर पाहाव तशा तन्मयतेने अनुभवत होता. अशा उंचीचे बौद्धिक अनुभव किती मिळतात आपल्याला दैनिक आयुष्यात? 'ऑफ बीट माणस' अशी एका वर्षीची थीम होती. डॉ. राणी बंग, डॉ. वंदना शिवा यांच्यासारख्या व्यक्ती त्यांच्या 'ऑफ बीट' वाटणाऱ्या पण स्वभावाशी सुसंगत जाणाऱ्या प्रवासाने विद्यार्थ्यांना खिळवत होत्या, तर मुस्लिम स्त्रियांमध्ये काम करणाऱ्या रझिया पटेल किंवा साताऱ्याजवळ ग्रामविकासाचे काम करणारे डॉ. पोळ प्रतिनिधींना व्यापक सामाजिक जाण देत होते.

२००७ साली जाणवायला लागल की आता मंडपाचा खर्च वाढत डोईजड होतोय. मंडप आला की फॅन-लाइट्स आले. लोडशेडिंग असल्यामुळे भाड्याची जनरेटर व्हॅन (आणि तिच भाड) आली. पुन्हा सहा हजार लोकांची (डबे आणून का होईना) पण एकत्र भोजनव्यवस्था... आम्ही फॉरमॅट बदलायचा अस ठरवल. संध्याकाळी चार ते रात्री दहा असा दोन दिवसांचा कार्यक्रम ठेवला. त्यामुळे मंडपावर छत नसल तरी चालत. डिसेंबरात सायंकाळ लवकर होत असल्यामुळे स्क्रीन्स लवकर प्रकाशमान होतात. आधी विद्यार्थ्यांसाठी भारतीय बैठक तर पालकांसाठी खुर्च्या असत. विद्यार्थ्यांना सतत जमिनीवर बसणडी जड होई. सर्वांना खुर्च्या द्यायच्या तर ३५०० ला 'हाऊसफुल्ल' होणार. इलाज नाही. आता डीव्हीडीजमध्ये वेध उपलब्ध असतो. चार शहरांमध्ये होतो... 'पण प्रत्यक्ष अनुभवाचा थरार काही वेगळाच!' लोक म्हणतात.

एकेक वेध डिझाइन करण्याची माझी फेजही विलक्षण असते. जे सूत्र असतं त्याकडे वेगवेगळ्या तऱ्हेन पाहायच... २००९च्या ठाणे वेध च सूत्र 'सातत्याची गुरुकिल्ली' अर्थात 'द की ऑफ कन्सिस्टन्सी'... सातत्य म्हणजे नेमक काय? सातत्य प्रयत्नांच की परिणामांच? सातत्यामध्ये रूटीन येऊ नये म्हणून काय करायच? सातत्य आणि कल्पकता यांच नात काय?... असे सारे प्रश्न माझ्या डोळ्यासमोर येऊ लागतात. या प्रश्नांना उत्तर देणारी माणस शोधायचा प्रवास सुरु होतो. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडचे विवेक सावंत! नाव पुढे येत. विवेकला मोठ्ठा फोन... त्याच्या 'सी डॅक' मध्यल्या दिवसांपासून तो माझा मित्र. विवेकशी बोलतान मी नोट्स काढत असतो. विवेक मला छान समजावतो. फोन ठेवल्यावर मला 'वेध' चं गाण दिसू लागत...

सूर्य तोच तो, धरा तीच ती
रोज नव्याने पहाट फुलते
स्थिर त्याच गगनात निळ्याही
नवरंगांची उधळण खुलते.

मी अमोल गुप्ताला फोन लावतो. 'सोसायटी मिस्टेक्स स्टॅबिलिटी फॉर कन्सिस्टन्सी' तो म्हणतो. 'तारे जमी पर' हा समाजाच्या दृष्टीने इनकन्सिस्टंट मुलांवरचा चित्रपट. अमोलशी चर्चा होते.

एक चिरंतन गती तरीही, रोज नवे आवर्तन घडते
एक झाड अन् तीच डहाळी, फूल सकाळी नवेच फुलते.

त्या त्या वर्षीचा वेध माझ्या मनांत असा आकार घ्यायला लागतो. हळूहळू तो सर्वांचा बनतो आणि दर वर्षीचा वेध संपल्यानंतर येणाऱ्या थकलेल्या रिकामपणामध्ये मी शोधायला लागतो पुढच्या वर्षाच सूत्र... गेली अठरा वर्ष! हा ध्यास आणि अभ्यास सुरुच आहे.

नगरच्या वेधमध्ये एका वर्षी शेवटच सत्र संपत असताना समोर बसलेल्या हजारो (हो,... वेध अहमदनगर - तिसऱ्या वर्षी तीन हजार उपस्थिती) विद्यार्थ्यांमधली एक विद्यार्थिनी ताडकन उठली. व्यासपीठाकडे धाव घेत मला म्हणाली, 'सर, मला बोलू द्याल दोन मिनीट?' मी तिच्या हातात माइक दिला.

'आज सकाळपासून मी इथे समोर बसून पाहते आहे, ऐकते आहे... असा दिवस मी कधी पाहिलाच नव्हता... मी... मी एक कलाकार आहे... मलाही माझ भविष्य घडवायचआहे... काका, तुम्ही सर्वांनी आमच्यासाठी जे दिल आहे ते जवळ ठेवून मी पुढे जाणार आहे... मी या दिवसाची आठवण कधी खाली पडून देणार नाही सर!' त्याच्यापुढे तिला बोलता आल नाही... सारी सभा स्तब्ध होती.

हजारो विद्यार्थ्यांच्या मनातला वेध कधी संपत नाही, हीच 'वेध'ची जादू!

**- डॉ. आनंद नाडकर्णी**

(शहाण्यांचा सायकिॲट्रिस्ट मधून)